Annexure 'Q'

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि.२४-०१-२०१८ च्या बैठकीत वाहनांबाबत सादर करावयाची टिप्पणी.

प्रवेश नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ अन्वये प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या मार्गदर्शनानुसार व संनियंत्रणांनुसार राज्यातील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षा मार्फत, सीईटी व कॅप राउंड, आयोजित केले जातात. राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षा चे आयुक्त हे प्रवेश नियामक प्राधिकरणाचे सचिव आहेत. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.४-८-२०१५ च्या शासन निर्णयान्वये प्राधिकरण व सीईटी कक्ष या कार्यालयांकरिता अनुक्रमांक २२ व ३० पदे मंजुर असुन प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयाकरिता मा. अध्यक्ष, या पदासह अवर सचिव (१ पद), कक्ष अधिकारी (२ पदे) व अन्य कर्मचारीवृंद मंजुर आहे.

प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून एकंदरित राज्यातील ३७०० हुन जास्त खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक शैक्षणिक संस्थांतील प्रवेशांचे नियमनाचे कामकाज करण्यात येते. उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाशी निगडित उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, कला, तसेच वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालयांशी संबंधित अभ्यासक्रम व संबंधित संस्थांतील प्रवेशांचे विनियमन करण्याचे व्यापक कामकाज, प्राधिकरण कार्यालयाकडुन करण्यात येते. या अनुषंगाने प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठका आयोजित करणे, प्राधिकरणाच्या निर्णयांची अंमलबजावणी करणे, कार्यालयीन कामकाजास्तव वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, तंत्र शिक्षण संचालनालय, सीईटी कक्ष कार्यालय, मंत्रालय, मा. अध्यक्ष, प्र. नि. प्रा. यांचे कार्यालय व अन्य संबंधित कार्यालये इथे जाणे येणे सुलभ होण्यासाठी व तद्नुषंगिक कार्यालयीन कामकाज पार पाडणे सुलभ व्हावे या साठी प्राधिकरण कार्यालयाकरिता व राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षाकरिता वाहनाची नितांत आवश्यकता होती.

सदर बाब तत्कालीन सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष यांच्या निर्दशनास आणण्यात आली. दोन्ही प्राधिकरणे व राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष अस्तित्वात येण्यापूर्वी शिक्षण शुल्क व प्रवेश नियंत्रण समिती कार्यालयासाठी पुढीलप्रमाणे तीन वाहने उपलब्ध होती,-

१) मा. अध्यक्ष, प्रवेश नियंत्रण समिती – MH -01-BA-1028 (Maruti Esteem)
२) मा. अध्यक्ष, शुल्क नियंत्रण समिती – MH -01-BA-1027 (Maruti Esteem)
३) कार्यालयीन सचिव, शिक्षण शुल्क व प्रवेश नियंत्रण समिती – MH -02-AK-210 (Maruti Swift Dzire)

अधिनियम, २०१५ अन्वये प्रवेश नियामक प्राधिकरण, शुल्क नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष अस्तित्वात आले व या तीनही कार्यालयांकरिता वेगवेगळा अधिकारीवृंद शासनाकडुन मंजुर झाला. दोन्ही समिती अध्यक्षांची दोन्ही वाहने साधारणतः मार्च २००४ पासुन वापरात असल्याने (जुनी झाल्याने) तसेच या दोन्ही वाहनांच्या तांत्रिक बिघाडांमुळे प्राधिकरणांचे दोन्ही मा. अध्यक्ष व आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष

यांच्याकरिता नवीन वाहने घेणे आवश्यक झाल्याने तसा निर्णय घेण्यात आला.
त्या अनुषंगाने पुढील प्रमाणे तीन नवीन वाहने घेण्यात आली,-

१) मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण - MH-02-AK-271 (Toyota Corolla Altis)
२) मा. अध्यक्ष, शुल्क नियामक प्राधिकरण - MH -02-AK-028 (Maruti Ciaz)
३) सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष- MH -02-EE-4349 (Volkswagen Vento)

सदर तीन नवीन वाहने उपलब्ध झाल्यामुळे त्या पुर्वीची उपलब्ध असलेली उक्त नमूद तीन वाहने पुढील प्रमाणे वापरात आल्याचे दिसून येते,-

१) सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण - MH-02-AK-210 (Maruti Swift Dzire)
२) राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष कार्यालय-MH-01-BA-1028 (Maruti Esteem)
३) शुल्क नियामक प्राधिकरण कार्यालय - MH-01-BA-1027 (Maruti Esteem)

प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयाकरिता एकही वाहन उपलब्ध नसल्याने वाहन क्र.MH-01-BA-1028 जे प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या मा.अध्यक्षांसाठी वापरात होते ते यथावकाश कार्यालयाच्या आवश्यकतेमुळे प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयास उपलब्ध होणे अपेक्षित होते. याबाबत माहे एप्रिल, २०१६ मधे तत्कालीन सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्याशी झालेल्या विचारविनिमयाअंती राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षाकरिता प्रवेश नियंत्रण समितीच्या मा. अध्यक्षांचे वापरात असलेले जुने वाहन MH-01-BA-1028 उपलब्ध करण्यात आले व प्राधिकरण कार्यालयाकरिता खाजगी कंत्राटदरांकडुन दरपत्रके मागवून दि.२२-०४-२०१६ च्या कार्यालयीन आदेशान्वये सुयोग्य कंत्राटदाराकडून वाहन उपलब्ध करण्यात आले. प्राधिकरण कार्यालयाच्या कामकाजाचा व्यापक आवाका, त्याचा निपटारा होण्याची विहीत कालमर्यादा, विविध ठिकाणी होणाऱ्या बैठका, अपुरी स्ाधनसामग्री व अपुरा कर्मचारी वृंद या पार्श्वभूमीवर प्राधिकरण कार्यालयाच्या कामकाजाचा निपटारा सुलभपणे व्हावा यासाठी प्राधिकरणाच्या अवर सचिवांना कार्यालयीन कामकाजाकरिता उपलब्ध करण्यात आलेल्या वाहनाचे संपूर्ण संनियंत्रण व नियमन करण्याचे अधिकार, दि.३-०५-२०१६ च्या कार्यालयीन आदेशान्वये प्रदान करण्यात आले. सद्यस्थितित दि.०८-०९-२०१७ च्या कार्यालयीन आदेशानुसार विना वाहनचालक चार चाकी वाहन, प्राधिकरण कार्यालयास इंधनासह पुरविण्याबाबत व सदर वाहनाच्या दरमहा २००० कि.मी. पर्यंतच्या भाडयापोटी (विहित करारनामाच्या अटी व शर्तींनुसार) रु.२५०००/- दर महा अदा करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष कडेही भाडेतत्वावर वाहन घेण्यात आले आहे.

शुल्क नियामक प्राधिकरण (पूर्वीच्या शिक्षण शुल्क समिती) कार्यालयास, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने सन २००४ मध्ये उपलब्ध करुन दिलेल्या वाहन क्र. एमएच-०१ बीए -१०२८ हया मारुती वाहन खरेदीस १२ वर्षांपेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने व ते मागील साधारण एक वर्षापासुन दूरुस्ती अभावी बंद असल्याने, सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण यांनी पत्र क्र. शुनिप्रा/वाहन/२०१६/५९, दि. २८/०९/२०१६ च्या पत्रान्वये वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयास वाहनाचे नोंदणी पुस्तक, सोबत पाठवुन सदर वाहन परत करण्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याकरिता संचालनालयास कळविले होते.

तथापि सदर वाहन अजुन २ - ३ वर्ष वापरात राहू शकत असल्याचे दिसुन आल्याने सदर वाहन प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयासाठी उपलब्ध

होणेबाबत निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने सदर वाहन दुरुस्त करुन घेण्यात आले व त्याचा वापर कार्यालयीन कामकाजासाठी सुरु करण्यात आला. तथापि सदर वाहनात उदगवणाऱ्या तांत्रिक बिघाडांमुळे सदर वाहन उपयोगात येण्यास अडचण उदभवत आहे. सबब सदर वाहन वैद्यकीय शिक्षण संचालनालय यथावकाश परत करण्यचे प्रस्तावित आहे. प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षाचे नवीन कार्यालय सी एस टी जवळील न्यु एक्सेलसिअर बिल्डिंगमधे ८ व ९ व्या मजल्यावर स्थलांतरित होणार असुन दोन्ही कार्यालये सदर ठिकाणी कार्यरत होईपर्यंत कामकाजाच्या समन्वयाकरिता आवश्यकतेमुळे प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयाकरिता दि.०३-०५-२०१६ च्या कार्यालयीन आदेशाप्रमाणे भाडेतत्वावरील वाहन वापरणे योग्य राहील. सद्यस्थितीत सदर तत्वावर राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष करिताही वाहन वापरात आहे.

उक्त नमुद पार्श्वभूमीवर प्रवेश नियामक प्राधिकरणाचे मा. अध्यक्ष, सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालय व राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष कार्यालय यांच्याकरिता (कार्यालयीन कामकाजासाठी) वेगवेगळया वाहनांची तरतुद करण्यात आली आहे व त्यावरिल तद्नुषंगीक खर्च संबंधित कार्यालयांकडून करण्यात येत आहे.

प्रवेश नियामक प्राधिकरणास अवलोकनार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

********